20 MAR 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भूकंप हालचालींचा अभ्यास करणारे केंद्र शिवाजी विद्यापीठात

## रेडॉन जिओ-स्टेशनची स्थापना : भाभा अणुसंशोधन केंद्राकडून मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : कोल्हापूर आणि परिसरातील भूकंपसदृश्य हालचालींचा अभ्यास करणारे केंद्र शिवाजी विद्यापीठात स्थापन झाले आहे. लोणावळ्यानंतर असे केंद्र होणारे हे राज्यातील एकमेव अकृषी विद्यापीठ आहे. त्यासाठी भाभा अणुसंशोधन केंद्राने विद्यापीठात रेडॉन जिओ स्टेशनची स्थापना केली आहे.

सौरऊर्जा आणि डेटा कम्युनिकेशनद्वारे चालविले जाणारे स्वतंत्र युनिट असून, त्यामध्ये बीएसएनएल सिमचा वापर केला आहे. शंभर किलो वजनाचे हे स्टेशन २ मीटर जागेत स्थापित केले असल्याची माहिती सैफ सीएफसी प्रमुख प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी दिली. मुंबईच्या भाभा अनुसंशोधन केंद्राने इंद्रा (आयएनडीआरए) प्रकल्प सुरू केला आहे. त्यासाठी स्वतंत्र, सौरऊर्जेवर चालणारे रेडॉन जिओ-स्टेशन विकसित केले गेले आहे. या प्रकल्पाअंतर्गत रेडॉन जिओ-स्टेशनचा स्थापनेपासून देखभालीपर्यंतचा खर्च भाभा अनुसंशोधन केंद्राकडून करण्यात येत आहे. ४ मार्च २०२२ रोजी शिवाजी विद्यापीठाच्या या स्टेशनची उभारणी भौतिकशास्त्र विभागातर्फे सैफ-डीएसटी केंद्राच्या आवारामध्ये करण्यात आली आहे.




शिवाजी विद्यापीठात भूकंपसदृश्य हालचालींचा अभ्यास करण्यासाठी बसविण्यात आलेली यंत्रणा. त्याच्या उद्घाटनावेळी कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. राजपूर, प्रा. फुलारी, प्रा. ए. एम. महाजन, डॉ. संदीप कंसल, जी. एस. पलसे, प्रा. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. आर. जी. सोनकवडे, प्रा. एस. एस. महाजन, प्रा. आर. के. कामत उपस्थित होते.

याआधीही भाभा अनुसंशोधन केंद्राच्या सहकार्याने पर्यावरणातील किरणोत्साराचे मापण करणाऱ्या प्रकल्पाची विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात स्थापना करण्यात आली आहे. प्रा. सोनकवडेंच्या विशेष प्रयत्नांतून या दोन्ही स्टेशनची स्थापना होणे ही विद्यापीठाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. या क्षेत्रातील संशोधन उपक्रमांना अजून चालना मिळेल. ज्यामुळे प्राध्यापक आणि विद्यार्थी पुढील संशोधन करू शकतील. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डी. टी. शिर्के, प्रकुलगुरू प्रा. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा विभागप्रमुख गजानन पळसे, शास्त्र विभागाचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत उपस्थित होते.

20 MAR 2022 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ए. डी. सायंटिफिक इंडेक्समध्ये ४८ संशोधक

## शिवाजी विद्यापीठाचा बहुमान : प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा एच-इंडेक्स ७६


प्रतिनिधी
कोल्हापूर

'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स'तर्फे नुकत्याच जाहीर झालेल्या 'वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग-२०२२' मध्ये शिवाजी विद्यापीठातील ४८ संशोधक-प्राध्यापकांचा समावेश आहे. गुगल स्कॉलर सायटेशन्सच्या आधारे प्राप्त झालेल्या यादीत गतवर्षीच्या संशोधकांनी त्यांचे स्थान कायम राखले आहे. विद्यापीठाला देशातील २१४५ संस्थांमध्ये 'एच इंडेक्स'च्या आधारावर देशात ६३ वे स्थान प्राप्त झाले आहे. या यादीमध्ये प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा एच-इंडेक्स हा सर्वाधिक म्हणजे ७६ इतका आहे. भारतातील मोजक्याच संशोधकांचा इतका मोठा एच इंडेक्स आहे.

एडी सायंटिफिक इंडेक्स (अल्पर-डोजर सायंटिफिक इंडेक्स), जर्नल्स आणि विद्यापीठांचे मूल्यमापन करणाऱ्या इतर प्रणालींपेक्षा वेगळी आहे. यात शास्त्रज्ञांच्या संशोधनातील कामगिरी आणि वैयक्तिक वैज्ञानिक उत्पादकतेच्या अतिरिक्त मूल्यावर आधारित क्रमवारी आणि विश्लेषण केले आहे. शिवाय शास्त्रज्ञांच्या वैज्ञानिक वैशिष्ट्यांवर आधारित संस्थांची क्रमवारी काढली जाते. शिवाजी विद्यापीठ मटेरियल सायन्स संशोधनात सर्वोत्तम संस्थांपैकी एक म्हणून ओळखले जाते. ही क्रमवारी सर्व विज्ञान विषयांतील संशोधनावर आधारित आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के संख्याशास्त्र विषयातील एकमेव संशोधक आहेत.



कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के



डॉ. पी. एस. पाटील



डॉ. सोनकवडे

### विद्यापीठातील संशोधकांची नावे

**भौतिकशास्त्र**-डॉ. पी.एस. पाटील (७६), डॉ. के. वाय. राजपुरे (५७), डॉ. सी. एच. भोसले (५४), डॉ. ए.व्ही. मोहोळकर (५२), डॉ. एन. एल. तरवाळ (२८), डॉ. आर. जी. सोनकवडे (२६), डॉ. व्ही. आर. पुरी (२५), डॉ. एस. बी. सादळे (१९), डॉ. एम. व्ही. टाकळे (१८), डॉ. टी. जे. शिंदे, इस्लामपूर (१८), डॉ. ए. बी. गडकरी, गोखले महाविद्यालय, कोल्हापूर (१६) **रसायनशास्त्र**- डॉ. के. एम. गरडकर (४०), डॉ. एस. एस. कोळेकर (३४) , डॉ. ए. व्ही. घुले (३१), डॉ. एस. डी. डेळेकर (३१), डॉ. जी. बी. कोळेकर (२७), डॉ. डी. एम. पोरे (२४), डॉ. आर. एस. साळुंखे (२२), डॉ. एम. बी. देशमुख (२०), डॉ. जी. एस. राशीनकर (१९), डॉ. डी. एच. दगडे (१८), डॉ. ए. दोड्डमणी, शाहू महाविद्यालय, कोल्हापूर (११), डॉ. एस. एम. पाटील, गारगोटी (१०), डॉ. एन. आर. प्रसाद, जयसिंगपूर (१०) **जैवरसायनशास्त्र**- डॉ. एस. पी. गोविंदवार (६७), डॉ. जे. पी. जाधव (४५) ,डॉ. के. डी. सोनावणे (१९), डॉ. पी. बी. दंडगे (१३), डॉ. पी. के. पवार (१३), डॉ. नीरज राणे, पुणे (१२) **इलेक्ट्रॉनिक्स** - डॉ. एस. आर. सावंत (२७), डॉ. टी. डी. डोंगळे (२५), डॉ. पी. एन. वासंबेकर (२३), डॉ. आर. आर. मुधोळकर (१३) **वनस्पतीशास्त्र**- डॉ. एन. बी. गायकवाड (१५), डॉ. डी. के. गायकवाड (१३) **प्राणीशास्त्र**- (स्व.) डॉ. एम. व्ही. शांताकुमार (१६), डॉ. टी. व्ही. साठे (११) **पर्यावरणशास्त्र**- डॉ. पी. डी. राऊत (१६), डॉ. व्ही. कोरे (१०), डॉ. एस. चोंदे (१०) **अन्नविज्ञान व अभियांत्रिकी**- डॉ. ए. के. साहू (१५), डॉ. आर. रणवीर (१४) **फार्मसी**- डॉ. जे. डिसुझा, वारणानगर (१९), डॉ. एस. पायघन (१७) **संख्याशास्त्र**- डॉ. डी. टी. शिर्के (१६) **गणितशास्त्र**- डॉ. के. डी. कुचे (१४) **नॅनोसायन्स व तंत्रज्ञान**- डॉ. किरण कुमार शर्मा (१४).

20 MAR 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# ‘ए.डी. सायंटिफिक इंडेक्स’च्या क्रमवारीत विद्यापीठाच्या ४८ संशोधकांचे स्थान कायम

## ‘एच इंडेक्स’मध्ये देशात ६३ वे स्थान; प्र-कुलगुरू पाटील यांचा सर्वाधिक एच-इंडेक्स ७६

कोल्हापूरः पुढारी वृत्तसेवा

‘ए.डी. सायंटिफिक इंडेक्स’ने नुकत्याच जाहीर केलेल्या ‘वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग-२०२२’मध्ये शिवाजी विद्यापीठातील ४८ संशोधक-प्राध्यापकांचा आहे. गुगल स्कॉलर सायटेशन्सच्या आधारे काढलेल्या निर्देशांक यादीत गतवर्षीच्या संशोधकांनी त्यांचे स्थान कायम राखले आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांचा एच-इंडेक्स देशात सर्वाधिक म्हणजे ७६ असून मोजक्या संशोधकांमध्ये त्यांचा समावेश आहे.





प्र-कुलगुरु डॉ. पी.एस.पाटील

एडी सायंटिफिक इंडेक्स (अल्पर-डोजर सायंटिफिक इंडेक्स), जर्नल्स व विद्यापीठांचे मूल्यमापन करणाऱ्या इतर प्रणालींपेक्षा वेगळी आहे. यात शास्त्रज्ञांच्या संशोधनातील कामगिरी, वैयक्तिक वैज्ञानिक उत्पादकतेच्या अतिरिक्त मूल्यावर आधारित क्रमवारी, विश्लेषण करण्यात आले आहे. शास्त्रज्ञांच्या वैज्ञानिक वैशिष्ट्यांवर आधारित संस्थांची क्रमवारी काढली जाते. एच-इंडेक्सच्या आधारे शिवाजी विद्यापीठाने भारतातील २१४५ संस्थांमध्ये ६३ वे स्थान मिळवले आहे. विद्यापीठ मटेरियल सायन्स संशोधनात सर्वोत्तम संस्थांपैकी एक म्हणून ओळखले जाते. ही क्रमवारी सर्व विज्ञान विषयांतील संशोधनावर आधारित आहे.

संशोधकांत स्थान प्राप्त करणारे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के हे संख्याशास्त्र विषयातील एकमेव संशोधक आहेत. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांना भौतिकशास्त्रातील संशोधनासाठी क्रमवारीत आघाडीचे स्थान मिळाले आहे.

यादीत जगातल्या २१६ देशांतील १४ हजार ९८१ विद्यापीठांतील ८ लाख२५ हजार ७१० संशोधकांच्या माहितीचे पृथक्करण केले आहे. क्रमवारीत रसायनशास्त्राचे १३, पदार्थविज्ञान ११, जैवरसायनशास्त्र ६, इलेक्ट्रॉनिक्स ४, पर्यावरणशास्त्र ३, फूड सायन्स २, फार्मसी २, वनस्पतीशास्त्र २, प्राणीशास्त्र २, नॅनो विज्ञान व तंत्रज्ञान १, गणित १ असे ४८ आजी-माजी संशोधक आहेत. यादीत नऊ निवृत्त प्राध्यापक तर संलग्नित महाविद्यालयांतील सात संशोधक आहेत.

### ए.डी. सायंटिफिक इंडेक्स २०२२ च्या यादीत स्थान लाभलेले संशोधक, त्यांचा एच-निर्देशांक

भौतिकशास्त्र- प्रा. डॉ. पी.एस. पाटील (७६), डॉ. के.वाय. राजपुरे (५७), डॉ. सी.एच. भोसले (५४), डॉ. ए.व्ही. मोहोळकर (५२), डॉ. एन.एल. तरवाळ (२८), डॉ. आर.जी. सोनकवडे (२६), डॉ. व्ही.आर. पुरी (२५), डॉ. एस.बी. सादळे (१९), डॉ. एम.व्ही. टाकळे (१८), डॉ. टी.जे. शिंदे, इस्लामपूर (१८), डॉ. ए.बी. गडकरी, गोखले महाविद्यालय (१६). रसायनशास्त्र- डॉ. के. एम. गरडकर (४०), डॉ. एस.एस. कोळेकर (३४), डॉ. ए.व्ही. घुले (३१), डॉ. एस.डी. डेळेकर (३१), डॉ. जी. बी. कोळेकर (२७), डॉ. डी. एम. पोरे (२४), डॉ. आर. एस. साळुंखे (२२), डॉ. एम. बी. देशमुख (२०), डॉ. जी. एस. राशीनकर (१९), डॉ. डी.एच. दगडे (१८), डॉ. ए. दोड्डमणी, शाहू महाविद्यालय (११), डॉ. एस. एम. पाटील, गारगोटी (१०), डॉ. एन.आर. प्रसाद, जयसिंगपूर (१०). जैवरसायनशास्त्र- डॉ. एस.पी. गोविंदवार (६७), डॉ. जे.पी. जाधव (४५), डॉ. के. डी. सोनावणे (१९), डॉ. पी. बी. दंडगे (१३), डॉ. पी.के. पवार (१३), डॉ. नीरज राणे, पुणे (१२). इलेक्ट्रॉनिक्स - डॉ. एस.आर. सावंत (२७), डॉ. टी.डी. डोंगळे (२५), डॉ. पी.एन. वासंबेकर (२३), डॉ. आर.आर. मुधोळकर (१३). वनस्पतीशास्त्र- डॉ. एन.बी. गायकवाड (१५), डॉ. डी.के. गायकवाड (१३). प्राणीशास्त्र- डॉ. एम.व्ही. शांताकुमार (१६), डॉ. टी.व्ही. साठे (११). पर्यावरणशास्त्र- डॉ.पी.डी. राऊत (१६),. डॉ. व्ही. कोरे (१०),. डॉ. एस. चोंदे (१०). अन्नविज्ञान व अभियांत्रिकी- डॉ. ए.के. साहू (१५), डॉ. आर. रणवीर (१४). फार्मसी- डॉ. जे. डिसुझा, वारणानगर (१९), डॉ. एस. पायघन (१७). संख्याशास्त्र- डॉ. डी.टी. शिर्के (१६). गणितशास्त्र- डॉ. के.डी. कुचे (१४). नॅनो सायन्स व तंत्रज्ञान- डॉ. किरणकुमार शर्मा (१४).

जनसंपर्क कक्ष
20 MAR 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ए . डी. इंडेक्सच्या यादीत विद्यापीठातील ४८ जण



डॉ. पाटील

कोल्हापूर, ता. १९ : 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स'तर्फे जाहीर झालेल्या 'वर्ल्ड सायंटिस्ट अँण्ड युनिव्हर्सिटी रँकिंग-२०२२'मध्ये शिवाजी विद्यापीठातील एकूण ४८ संशोधक-प्राध्यापकांचा समावेश झाला आहे. गुगल स्कॉलर सायटेशन्सच्या आधारे काढण्यात आलेल्या निर्देशांक यादीत गेल्या वर्षी असलेल्या संशोधकांनी त्यांचे स्थान कायम राखले आहे.

विद्यापीठास देशातील दोन हजार १४५ संस्थांमध्ये 'एच इंडेक्स'च्या आधारावर देशात ६३ वे स्थान मिळाले आहे. यादीत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा एच-इंडेक्स हा सर्वाधिक म्हणजे ७६ आहे. भारतातील मोजक्याच संशोधकांचा इतका मोठा एच इंडेक्स आहे.

एडी सायंटिफिक इंडेक्स (अल्पर-डोजर सायंटिफिक इंडेक्स) जर्नल्स आणि विद्यापीठांचे मूल्यमापन करणाऱ्या इतर प्रणालीपेक्षा वेगळा आहे. यात शास्त्रज्ञांच्या संशोधनातील कामगिरी आणि वैयक्तिक वैज्ञानिक उत्पादकतेच्या अतिरिक्त मूल्यावर

पान ९ वर »

# ए . डी. इंडेक्सच्या यादीत विद्यापीठातील ४८ जण

» पान १ वरून

आधारित क्रमवारी व विश्लेषण करण्यात आले. शिवाय, शास्त्रज्ञांच्या वैज्ञानिक वैशिष्ट्यांवर आधारित संस्थांची क्रमवारी काढली जाते. विद्यापीठ मटेरियल सायन्स संशोधनात सर्वोत्तम संस्थांपैकी एक म्हणून ओळखले जाते. मात्र, ही क्रमवारी सर्व विज्ञान विषयांतील संशोधनावर आधारित आहे. संशोधकांत स्थान प्राप्त करणारे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के संख्याशास्त्र विषयातील एकमेव संशोधक असून, प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांना भौतिकशास्त्रातील संशोधनासाठी क्रमवारीत आघाडीचे स्थान मिळाले आहे.

**एच-इंडेक्स म्हणजे काय?**

एच-इंडेक्स हा संशोधन लेखक-स्तरीय निर्देशांक आहे, जो प्रकाशनांची उपयुक्तता, उपयोजन आणि उद्धरण प्रभाव बाबींचे मापन करतो. संशोधनासाठीची पारितोषिके जिंकणे, संशोधन फेलोशिपसाठी स्वीकारली जाणे आणि विद्यापीठांत उच्च पदे धारण करणे यासारख्या यश दर्शविणाऱ्या बाबींशी एच-इंडेक्स निगडित असतो. हा निर्देशांक शास्त्रज्ञांच्या सर्वाधिक उद्धृत केलेल्या कागदपत्रांच्या संचावर आणि त्यांना इतर प्रकाशनांमध्ये मिळालेल्या उद्धरणांच्या संख्येवर आधारित आहे. २००५ मध्ये यूसी सॅन दिएगो येथील भौतिकशास्त्रज्ञ जॉर्ज ई. हिर्श यांनी सैद्धांतिक भौतिकशास्त्रज्ञांची सापेक्ष गुणवत्ता निश्चितीसाठी निर्देशांक सुचविला होता.

**यादीत स्थान मिळालेले संशोधक (कंसात एच-निर्देशांक)**

**भौतिकशास्त्र**- डॉ. पी. एस. पाटील (७६), डॉ. के. वाय. राजपुरे (५७), डॉ. सी. एच. भोसले (५४), डॉ. ए. व्ही. मोहोळकर (५२), डॉ. एन. एल. तरवाळ (२८), डॉ. आर. जी. सोनकवडे (२६), डॉ. व्ही. आर. पुरी (२५), डॉ. एस. बी. सादळे (१९), डॉ. एम. व्ही. टाकळे (१८), डॉ. टी. जे. शिंदे, इस्लामपूर (१८), डॉ. ए. बी. गडकरी, गोखले महाविद्यालय (१६). **रसायनशास्त्र**- डॉ. के. एम. गरडकर (४०), डॉ. एस. एस. कोळेकर (३४), डॉ. ए. व्ही. घुले (३१), डॉ. एस. डी. डेळेकर (३१), डॉ. जी. बी. कोळेकर (२७), डॉ. डी. एम. पोरे (२४), डॉ. आर. एस. साळुंखे (२२), डॉ. एम. बी. देशमुख (२०), डॉ. जी. एस. राशीनकर (१९), डॉ. डी. एच. दगडे (१८), डॉ. ए. दोड्डमणी, शाहू महाविद्यालय (११), डॉ. एस. एम. पाटील, गारगोटी (१०), डॉ. एन. आर. प्रसाद, जयसिंगपूर (१०). **जैवरसायनशास्त्र**- डॉ. एस. पी. गोविंदवार (६७), डॉ. जे. पी. जाधव (४५), डॉ. के. डी. सोनावणे (१९), डॉ. पी. बी. दंडगे (१३), डॉ. पी. के. पवार (१३), डॉ. नीरज राणे, पुणे (१२). **इलेक्ट्रॉनिक्स**- डॉ. एस. आर. सावंत (२७), डॉ. टी. डी. डोंगळे (२५), डॉ. पी. एन. वासंबेकर (२३), डॉ. आर. आर. मुधोळकर (१३). **वनस्पतीशास्त्र**- डॉ. एन. बी. गायकवाड (१५), डॉ. डी. के. गायकवाड (१३). **प्राणीशास्त्र**- डॉ. एम. व्ही. शांताकुमार (१६), डॉ. टी. व्ही. साठे (११). **पर्यावरणशास्त्र**- डॉ. पी. डी. राऊत (१६), डॉ. व्ही. कोरे (१०), डॉ. एस. चोंदे (१०). **अन्नविज्ञान व अभियांत्रिकी**- डॉ. ए. के. साहू (१५), डॉ. आर. रणवीर (१४). **फार्मसी**- डॉ. जे. डिसूझा, वारणानगर (१९), डॉ. एस. पायघन (१७). **संख्याशास्त्र**- डॉ. डी. टी. शिर्के (१६). **गणितशास्त्र**- डॉ. के. डी. कुचे (१४). **नॅनोसायन्स व तंत्रज्ञान**- डॉ. किरणकुमार शर्मा (१४).

20 MAR 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स' मध्ये विद्यापीठाच्या ४८ संशोधकांचे स्थान कायम

## विद्यापीठास 'एच इंडेक्स 'मध्ये देशात ६३ वे स्थान; प्र-कुलगुरू पाटील यांचा एच-इंडेक्स ७६

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

'ए. डी. सायंटिफिक इंडेक्स'तर्फे नुकत्याच जाहीर केलेल्या 'वर्ल्ड सायंटिस्ट अँड युनिव्हर्सिटी रँकिंग-२०२२'मध्ये शिवाजी विद्यापीठातील ४८ संशोधक-प्राध्यापकांचा समावेश झाला आहे. गुगल स्कॉलर सायटेशन्सच्या आधारे काढलेल्या या निर्देशांक यादीत मागील वर्षाच्या संशोधकांनी त्यांचे स्थान कायम राखले आहे. नॅक 'अ++' मानांकित शिवाजी विद्यापीठासाठी ही अभिमानाची बाब आहे. विद्यापीठास २ हजार १४५ संस्थांत 'एच इंडेक्स'च्या आधारावर देशात ६३ वे स्थान प्राप्त झाले आहे. या यादीत प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांचा एच-इंडेक्स हा सर्वाधिक म्हणजे ७६ इतका आहे.



शिवाजी विद्यापीठ मटेरियल सायन्स संशोधनात सर्वोत्तम संस्थांपैकी एक म्हणून ओळखले जाते. या संशोधकांत स्थान प्राप्त करणारे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हे संख्याशास्त्र विषयातील एकमेव संशोधक असून, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी भौतिकशास्त्रातील संशोधनासाठी क्रमवारीत आघाडीचे स्थान मिळवले. या यादीत जगातल्या २१६ देशांतील १४,९८१ विद्यापीठांतील ८,२५,७१० संशोधकांच्या डेटाचे पृथ्थकरण केले आहे. या क्रमवारीत रसायनशास्त्राचे १३, पदार्थविज्ञान ११, जैवरसायनशास्त्र ६, इलेक्ट्रॉनिक्स ४, पर्यावरणशास्त्र ३, फूड सायन्स २, फार्मसी २, वनस्पतीशास्त्र २, प्राणीशास्त्र २, नॅनो विज्ञान व तंत्रज्ञान १, गणित १ असे एकूण ४८ आजी-माजी संशोधक समाविष्ट आहेत. या यादीत ९ निवृत्त प्राध्यापकांचा, तसेच संलग्नित महाविद्यालयांतील सात संशोधकांचाही समावेश आहे.

### एच-इंडेक्स म्हणजे काय?

एच-इंडेक्स हा संशोधन लेखकस्तरीय निर्देशांक आहे, जो प्रकाशनांची उपयुक्तता, उपयोजन आणि उद्धरण प्रभाव या बाबींचे मापन करतो. वैयक्तिक शास्त्रज्ञ व विद्वानांच्या संशोधन लेखनासाठी तो वापरला जातो. हा निर्देशांक शास्त्रज्ञांच्या सर्वाधिक उद्धृत केलेल्या कागदपत्रांच्या संचावर आणि त्यांना इतर प्रकाशनांमध्ये मिळालेल्या उद्धरणांच्या संख्येवर आधारित आहे.

### ए. डी. सायंटिफिक इंडेक्स २०२२ मधील संशोधक

**भौतिकशास्त्र :** डॉ. पी. एस. पाटील, के. वाय. राजपुरे, सी. एच. भोसले, ए. व्ही. मोहोळकर, एन. एल. तरवाळ, आर. जी. सोनकवडे, व्ही. आर. पुरी, एस. बी. सादळे, एम. व्ही. टाकळे, टी. जे. शिंदे, इस्लामपूर, ए. बी. गडकरी, गोखले महाविद्यालय, कोल्हापूर.

**रसायनशास्त्र :** डॉ. के. एम. गरडकर, एस. एस. कोळेकर, ए. व्ही. घुले, एस. डी. डेळेकर, जी. बी. कोळेकर, डी. एम. पोरे, आर. एस. साळुंखे, एम. बी. देशमुख, जी. एस. राशिनकर, डी. एच. दगडे, ए. दोड्डमणी (कोल्हापूर), एस. एम. पाटील (गारगोटी), एन. आर. प्रसाद (जयसिंगपूर).

**जैवरसायनशास्त्र :** डॉ. एस. पी. गोविंदवार, जे. पी. जाधव, के. डी. सोनावणे, पी. बी. दंडगे, पी. के. पवार, नीरज राणे.

**इलेक्ट्रॉनिक्स :** डॉ. एस. आर. सावंत, टी. डी. डोंगळे, पी. एन. वासंबेकर, आर. आर. मुधोळकर. **वनस्पतीशास्त्र :** एन. बी. गायकवाड, डी. के. गायकवाड. **प्राणीशास्त्र :** (स्व.) एम. व्ही. शांताकुमार, टी. व्ही. साठे. **पर्यावरणशास्त्र :** पी. डी. राऊत, व्ही. कोरे, एस. चोंदे. **अन्नविज्ञान व अभियांत्रिकी :** डॉ. ए. के. साहू, आर. रणवीर. **फार्मसी**, जे. डिसूझा (वारणानगर), डॉ. एस. पायघन. **संख्याशास्त्र :** डॉ. डी. टी. शिर्के, **गणितशास्त्र :** के. डी. कुचे. **नॅनो सायन्स व तंत्रज्ञान :** डॉ. किरण कुमार शर्मा.

20 MAR 2022
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कोल्हापूर परिसरातील भूकंपसदृश हालचालींवर लक्ष ठेवणे होणार सोपे

## लोणावळ्यानंतर शिवाजी विद्यापीठात रेडॉन जिओ स्टेशनची उभारणी; ही सुविधा असणारे राज्यातील एकमेव अकृषी विद्यापीठ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



**डॉ. आर. जी. सोनकवडे**

भाभा अणुसंशोधन केंद्राने लोणावळ्यानंतर आता शिवाजी विद्यापीठात रेडॉन जिओ स्टेशन उभारले आहे. याच्या माध्यमातून कोल्हापूर परिसरातील भूकंपसदृश हालचालींवर लक्ष ठेवणे आता सोपे होणार आहे. ही सुविधा असणारे राज्यातील हे एकमेव अकृषी विद्यापीठ आहे.

भाभा अणुसंशोधन केंद्र, मुंबईने 'इंद्रा' (इंडियन नेटवर्क फॉर डिटेक्शन ऑफ रेडॉन ॲनोम्ली) हा प्रकल्प सुरू केला आहे. त्यासाठी स्वतंत्र, सौरऊर्जेवर चालणारे रेडॉन जिओ स्टेशन विकसित केले आहे. या प्रकल्पाअंतर्गत रेडॉन जिओ



स्टेशन देशाच्या वेगवेगळ्या भागांत उभारण्यात येत आहे. उभारणीपासून ते देखभालीपर्यंतचा सर्व खर्च भाभा अणुसंशोधन केंद्राकडून करण्यात येत आहे. ४ मार्च २०२२ रोजी शिवाजी विद्यापीठाच्या स्टेशनची उभारणी भौतिकशास्त्र विभागातर्फे सैफ- डीएसटी केंद्राच्या आवारात केली आहे.

स्टेशन सौरऊर्जा व डेटा कम्युनिकेशनद्वारे चालविले जाणारे स्वतंत्र युनिट आहे. यात बीएसएनएल सीमचा वापर केला आहे. शंभर किलो वजनाचे स्टेशन दोन मीटर जागेत स्थापित केले आहे. कोल्हापूर परिसरातील भूकंपसदृश हालचालींवर लक्ष ठेवण्याच्या दृष्टीने रेडॉन जिओ स्टेशन महत्त्वपूर्ण ठरेल, अशी माहिती सैफ-सीएफसीप्रमुख प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी दिली.

> शिवाजी विद्यापीठात प्रा. सोनकवडे यांच्या विशेष प्रयत्नातून इरमॉन व आता रेडॉन जिओ स्टेशनची उभारणी ही महत्त्वपूर्ण गोष्ट आहे. भाभा अणुसंशोधन केंद्रातील शास्त्रज्ञांच्या मदतीने केलेल्या जिओ स्टेशनमुळे या क्षेत्रातील संशोधन उपक्रमांना चालना मिळेल. प्राध्यापक, विद्यार्थी याबाबत अद्ययावत संशोधन करू शकतील.
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के,** कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

## सौरऊर्जेवर चालणारे स्टँड अलोन जिओ स्टेशन





शिवाजी विद्यापीठातील जिओ स्टेशन परिसरातील भूकंपीय हालचालींचे निरीक्षण करून भूकंपशास्त्रीय संशोधनासाठी डेटाबेस तयार करेल. सौरऊर्जेवर चालणारे स्टँड अलोन जिओ स्टेशन रेडॉन डेटा थेट भाभा अणुसंशोधन केंद्रामधील सेंट्रल स्टेशनवर प्रसारित होईल. यापूर्वी भाभा अणुसंशोधन केंद्राने पर्यावरणातील किरणोत्साराचे मापन करणाऱ्या इंडियन इन्व्हायर्न्मेंटल रेडिएशन मॉनिटरिंग नेटवर्क (इरमॉन) शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात जुलै २०१९ मध्ये स्थापना केली आहे.

पुण्यनगरी

# अभ्यासक्रमविषयक तज्ज्ञ समितीत डॉ. कराडे

कोल्हापूर : प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्यातील अकृषी विद्यापीठे व अधिनस्त महाविद्यालयांमध्ये 'प्रशासकीय सेवा व व्यक्तिमत्त्व विकास' अभ्यासक्रम सुरू करण्यासंदर्भात शासनाला प्रस्ताव सादर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च शिक्षण संचालनालयामार्फत तज्ज्ञ समिती स्थापन केली आहे. यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागाचे प्रमुख डॉ. जगन कराडे यांची निवड करण्यात आली आहे. याबाबत उच्च शिक्षण विभागाचे संचालक डॉ. धनराज माने यांचे पत्र नुकतेच प्राप्त झाले आहे.

लोकमत

# विद्यापीठाच्या ७७ विषयांच्या परीक्षा सुरळीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या हिवाळी सत्रांच्या एकूण ६६४ अभ्यासक्रमांच्या परीक्षांपैकी ३६२ परीक्षांपैकी बहुतांशी परीक्षांना सुरुवात झाली आहे. यात शनिवारी बी.बी.ए., बी.ए.सह २४ अभ्यासक्रमांच्या एकूण ७७ विषयांच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या. ही परीक्षा एकूण १७,४६४ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने दिली.

दिवसभरात झालेल्या परीक्षांमध्ये बी.बी.ए., बी.ए. बी.सी.ए., एम.सी.ए, बी.जे., बी.एस्सी., बी.कॉम, एम.कॉम., बी.एस.डब्ल्यू, एम.लीब., बी.लीब., पी.जी. डिग्री मास्टर ऑफ व्हॅल्युएशन, एम.ए.एम.एस्सी (भूगोल), एम.बी.ए. इन रुरल मॅनेजमेंट, एम.आर.एस., बी.एस्सी. एम.स्सी (नॅनो), एम.टेक (रुरल टेक्नॉलॉजी), बी.एस्सी (कॉम्प्युटर सायन्स, शुगर टेक्नॉलॉजी, फूड सायन्स अॅन्ड टेक्नॉलॉजी) या अभ्यासक्रमाच्या ७७ विषयांचे पेपर शनिवारी पार पडले.

पुण्यनगरी

# विठ्ठलराव पाटील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

**कळे : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय सायकलिंग स्पर्धेत कळेतील विठ्ठलराव पाटील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश मिळवले. अमन तांबोळी, अभिजित कडवेकर, हेमंत लोहार या खेळाडूंनी पदकांची कमाई केली. त्यांना अ. भा. आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठ सायकलिंग संघामध्ये पात्रता मिळाली. मुलींच्या गटात स्वप्नाली संकपाळ हिने कास्यपदक मिळवले. अध्यक्ष विठ्ठल पाटील, प्राचार्य डॉ. कमलाकर राक्षसे, शारीरिक शिक्षण संचालक प्रा. विक्रम यमगेकर, डॉ. नितीन पाटील यांचे प्रोत्साहन लाभले.

सकाळ

# विद्यापीठात उद्यापासून मोडी अभ्यासक्रम

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठाच्या छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रातर्फे २१ ते २८ मार्चदरम्यान सर्टिफिकेट कोर्स इन मोडी स्क्रिप्ट प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी प्रवेशप्रक्रिया होत आहे. शिवपूर्वकाळापासून ते स्वातंत्र्यकाळापर्यंत प्रशासनाची तसेच दैनंदिन कामकाजासाठी मराठी भाषेबरोबरच मोडी लिपी मुख्य लिपी असल्याने या काळाबाबतचा इतिहास अभ्यासण्यासाठी ही लिपी ज्ञात असल्याशिवाय संशोधन होऊ शकत नाही. या काळातील कोणत्याही प्रशासकीय नोंदीसाठी ही लिपी ज्ञात असणे अपरिहार्य आहे. आज १९६० पूर्वीच्या शेतीसंबंधीच्या नोंदी, जन्म-मृत्यू नोंदी, खरेदी पत्रे तसेच या काळातील न्यायालयीन दावे यासंबंधीची कागदपत्रे मोडी लिपीतच उपलब्ध आहेत. इतिहास अभ्यासक, इतिहासप्रेमी यांनी प्रवेश घ्यावा, असे आवाहन केंद्राच्या समन्वयक डॉ. नीलांबरी जगताप यांनी केले आहे.